९८३२५-२८

<u>इयत्ता ११ वी प्रवेश</u>
प्रथम प्राधान्य

जा.क्र.उमाशि-३/११ वी प्रवेश/पुवि/२०११
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : १५/७/२०११

प्रति

शिक्षणाधिकारी,(माध्य)
जिल्हा परिषद,
पूणे / सोलापूर / अहमदनगर

<u>विषय</u> : <u>सी.बी.एस.ई. मंडळाशी संलग्न असलेल्या शाळांतील विद्यार्थ्यांच्या इयत्ता ११ वी प्रवेशाबाबत.</u>

संदर्भ : शा.प.क्र./एचएससी/१७११/(२७३/११)/उमाशि-१ दि १५.६.२०११

शैक्षणिक वर्ष २०११-१२ मधील इयत्ता ११ वी प्रवेशाच्या संदर्भात ज्या विद्यार्थ्यांनी सी.बी.एस.ई. मंडळाशी सलंग्न असलेल्या शाळांमधून इयत्ता १० वी ची बोर्डाची परीक्षा त्याचप्रमाणे इयत्ता १० वी ची शाळेची परीक्षा देवून उत्तीर्ण झालेले असतील अशा विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत संदर्भीय पत्रानुसार मार्गदर्शन केलेले आहे. (सोबत पत्राची प्रत जोडली आहे.)

१) सी.बी.एस.ई. बोर्डाच्या ज्या विद्यार्थ्यांनी इयत्ता १० वी ची परीक्षा सी.बी.एस.ई. बोर्डामार्फत देवून उत्तीर्ण झाले आहेत अशा विद्यार्थ्यांना प्रचलित नियमानुसार राज्य मंडळाशी संलग्न असलेल्या कनिष्ठ महाविद्यालयात इयत्ता ११ वी साठी प्रवेश देण्यात यावा.

२) सी.बी.एस.ई. मंडळाच्या दिनांक २०.९.२००९, दिनांक २.८.२०१० आणि दिनांक ३०.८.२०१० च्या परिपत्रकान्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार सी.बी.एस.ई. बोर्डाच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना त्यांच्याच शाळेत प्रवेश घ्यावा असे अपेक्षित आहे तथापि अपवादात्मक परिस्थितीत जसे की, एखादे ठिकाणाहून बदली झालेली असेल अशा बदलीच्या ठिकाणी सी.बी.एस.ई. बोर्डाची उच्च माध्यमिक शाळा नसेल तर अशा वेळी या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये म्हणून सी.बी.एस.ई. बोर्डाच्या दिनांक २०.९.२००९ च्या परिपत्रकासोबतच्या परिशिष्ठ – १ डी (१) मधील तरतूदीनुसार इतर बोर्डातील कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी बहिस्थ परीक्षा (**External Exam**) सी.बी.एस.ई. बोर्डाकडून उत्तीर्ण होण्याच्या अटीवर बंधपत्राच्या आधारे (**Bond**) ऑफलाईन पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपात प्रवेश देण्याची कार्यवाही करण्यात यावी. तद्नंतर सी.बी.एस.ई. बोर्डाकडून बहिस्थ परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आल्याच्या आधारावर त्यांचे इयत्ता ११ वी चे प्रवेश अंतिम करण्यात यावेत असे नमूद केलेले आहे.

३) सी.बी.एस.ई. बोर्डातील विद्यार्थ्यांच्या इयत्ता ११ वी प्रवेशाबाबत संदर्भीय शासन पत्रातील उपरोक्त मुद्दयांनुसार, ज्या विद्यार्थ्यांनी शाळेची इयत्ता १० वी परीक्षा उत्तीर्ण झालेली असतील अशा विद्यार्थ्यांनी संबंधित शहर / गावात सी.बी.एस.ई. बोर्डाची उच्च माध्यमिक विभागाचे वर्ग असतील तर त्यांनी सी.बी.एस.ई. बोर्डाच्या उच्च माध्यमिक वर्गातच प्रवेश घ्यावेत. अशा शहर / गावात महाराष्ट्र बोर्डाच्या उच्च माध्यमिक विभागात या विद्यार्थ्यांना इयत्ता ११ वी च्या वर्गात प्रवेश देवून नयेत असे आपल्या जिल्हयातील सर्व कनिष्ठ महाविद्यालयांना कळविण्यात यावे. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल उलट टपाली या कार्यालयास सादर करावा.

सदरचे पत्र **www.dydepune.com** या संकेतस्थळावरही प्रसिध्द केले आहे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१.

प्रत - सर्व प्राचार्य,
उच्च माध्यमिक विद्यालये,
पुणे विभाग, पुणे